# नगर परिषद पांढरकवडा

## संक्षिप्त ई-निविदा सुचना

ई -निविदा सुचना क्र. २९८ /२०२६-२७ प्रसिध्दि दिनांक १२/ ५ /२०२६

नगर परिषद पांढरकवडाच्या वतीने खालील प्रमाणे वर्णन केलेले विकास कामाकरीता पांढरकवडा नगर परिषदेकडुन महाराष्ट्र शासनाकडील सार्वजनिक बांधकाम (स्थापत्य) विभागाचे कामाचे किमतीनुसार योग्य वर्गात पंजीबध्द असलेल्या कंत्राटदाराकडुन ई निविदा द्विलिफाफा पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना mahatenders.gov.in या शासनाच्या संकेतस्थळावर दि.१३ /०५ /२०२६ पासुन पाहण्यास उपलब्ध आहे. निविदेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | अनामत रक्कम | काम करण्याचा कालावधी | कोरे निविदा प्रपत्र शुल्क |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| नागरी दलितेतर योजना अंतर्गत सन २०२५ -२०२६ | | | | | |
| **खुली निविदा** | | | | | |
| १ | पांढरकवडा शहरातील पोस्ट ऑफीस पासुन ते दिपक जनरल स्टोअर्स पर्यंत रस्त्याचे उष्णमिश्रीत पध्दतीने रस्त्याचे डांबरीकरण करणे. | १४७४५८०/- | १५०००/- | १२० दिवस | १५००/- |
| २ | पांढरकवडा शहरातील राम मंदीर पासुन ते बिरसामुंडा चौका पर्यंत रस्त्याचे उष्णमिश्रीत पध्दतीने रस्त्याचे डांबरीकरण करणे. | २३३२६९०/- | २४०००/- | १६० दिवस | २०००/- |

**ई- निविदा पध्दती तपशील**

| | | |
|---|---|---|
| १ | ऑन लाईन निविदा फॉर्म विक्री | दिनांक १३/ ०५ /२०२६ ते दिनांक २१/ ०५ /२०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजे पासुन |
| २ | ऑन लाईन निविदा कागदपत्रे सादर करण्याचा कालावधी | दिनांक १३/ ०५ /२०२६ ते दिनांक २१/ ०५ /२०२६ रोजी सायंकाळी ५.४५ वाजे पर्यंत |
| ३ | ऑन लाईन निविदा उघडणे तांत्रीक लिफाफा व बी. ओ. क्यु उघडणे | दिनांक २५/०५ /२०२६ सकाळी ११.०० नंतर |

**शर्ती व अटी**

१. कंत्राटदाराने योग्य त्या वर्गातील सा.बा.वि. चे पंजीकरण बाबत चे कागदपत्रे , GST , Pan card , Enrolment Certificate , IT Return (Last ३ Years) , Bid Capicity Certificate, आर्थिक पात्रता प्रमाणपत्र , Work in hand /Work done Certificate, Machinery List , Technical Person List , कंत्राटदारास कुठेही काळया यादीत टाकले नसल्याचे व सादर केलेली कागद पत्रे असल्याचे शपथ पत्र १०० चे स्टॅप वर (निविदा कालावधी मधील) व इतर आवश्यक कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहील.

२. प्रथम अनामत सुरक्षा रक्कम रकाना क्रमांक ३ मध्ये दर्शविलेल्या किमतीच्या १ % रक्कम ई निविदा सादर करतांना ऑनलाईन स्वरूपात व ९ % सुरक्षा रक्कम धावते देयकातुन कपात करण्यात येईल.

३. प्रत्येक कामाकरीता निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा 15 टक्के पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरीत रक्कमे साठी दोन पटीने रक्कम डीडी द्वारे सादर करणे अनिवार्य राहील उदा. 19 टक्के कमी दरासाठी खालील पुढील प्रमाणे 10 टक्के कमी दरापर्यंत 1 टक्के व 15 टक्के कमी दरा पर्यंत –(15 टक्के – 10टक्के – 5 टक्के) तसेच (19–15 ) = 4 टक्के करीता (4x2) = 8 टक्के असे एकुण ( 1+5+8 ) = 14 टक्के बॅंका किंवा शेड्युल बॅंकाकडुन काढलेला असावा व धनाकर्षाची मुदत निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान 3 महिनेपर्यंत असावी.
निविदा भरण्याच्या दिनांकानंतर किमान 3 महिनेपर्यंत असावी.

४. निम्नतम मंजूर निविदाकारांना कार्यरंभ आदेश दिल्यानंतर इतर निविदाकारांचे धनाकर्ष परत करण्यात येईल.

५. प्राप्त होणाऱ्या निधीच्या उपलब्धतेनुसार कामाचे आदेश देण्यात येईल. तसेच निधी उपलब्धतेनुसार बिलाचे प्रदान करण्यात येईल.

६. एकदा निविदा भरल्यानंतर अथवा वैधता कालावधी संपण्यापुर्वी निविदा मागे घेण्यात आल्यास कंत्राटदारास काळ्या यादीत टाकून भरलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल. यापुर्वी ज्या कंत्राटदारांना काळ्या यादीत टाकण्यात आले त्यांना मुदतपुर्व काळात निविदा प्रकियेत भाग घेता येणार नाही.

७. प्राप्त निवीदांपैकी कोणतीही एक निविदा स्विकारणे किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार नगर परिषदेने राखून ठेवला आहे.

८. काम करावयाच्या इतर शर्ती व अटी तसेच सविस्तर माहिती कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी नगर अभियंता बांधकाम विभाग न.प. पांढरकवडा यांच्याकडे पहावयास मिळतील.

९. निविदा धारकाचा ऑनलाईन वरील लिफाफा क्रमांक १ व लिफाफा क्रमांक २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या L-१ निविधारकाने Additional Performance Security Deposit आठ दिवसाचे आत मुख्याधिकारी नगर परिषद पांढरकवडा येथे सादर करणे बांधनकारक राहील.जर आठ दिवसाच्या मुदतीत सादर न केल्यास न्युनतम देकाराचा कामा बाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

१०. करारनाम्यात नमुद केल्याप्रमाणे काम सुरुन केल्यास किंवा काम अर्धवट सोडल्यास ठेकेदाराचे बयाणा अनामत रक्कम जप्त केली जाईल व काम दुसऱ्या ठेकेदाराकडुन करुन घेण्यात येईल.

११. सदर कामास शासन निर्णय दि.१४/०१/२०१९ मध्ये नमुद केल्यानुसार दोष दाईत्व कालावधी राहील.

१२. कामाची गुणवत्ता तपासणी (Third Party Inspection) नगरविकास विभाग शासन निर्णय २८/०३/२०१८ मध्ये नमुद केलेल्या शासकिय यंत्रणेकडुन करुन घ्यावे लागेल. (Third Party Inspection) करून घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१३. प्रस्तावीत कामाबाबत प्रचलीत तथा शासनाने वेळोवेळी अध्यावत स्वरुपात निर्गमीत केलेल्या सर्व आदेशानुसार पालन करणे कंत्राटदारास बंधनकारक राहील.

१४. कोणत्याही कारणाने प्रकल्पाच्या बांधकामात क्षती निर्माण झाल्यास संपुर्ण बांधकामाची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१५. सदर कामे करतांना काही अपघात होवुन वित्तहाणी किंवा जिवितहाणी झाल्यास त्यांची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

१६. प्रकल्पाचे काम सुरु झाल्यानंतर शासनाने नियुक्त केलेल्या प्रकल्पाचे व्यवस्थापक सल्लागाराने कामाची गुणवत्ता व देयक प्रमाणित केल्यानंतर उपलब्ध निधीच्या मर्यादेत कामाची देयक प्रदान करण्यात येईल

१७. वरील निविदा प्रकीया कुठल्याही क्षणी कोणत्याही टप्पावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांनी राखुन ठेवलेला आहे.

१८. करारनामा मध्ये नमुद केलेल्या मुद्दतीत काम पुर्ण न झाल्यास मुद्दती बाहेर प्रत्येक दिवसास करारनाम्यातील अटी व शर्ती प्रमाणे दंड आकारला जाईल.

१९. नगरपालीकेशी किंवा नगरपालिकेच्या अधिन किंवा नगरपालीकेने किंवा नगरपालीकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगरपरिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हीतसंबंधी किंवा आमच्याशी भागिदारी नाही याबाबत चे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र किंवा नोटराईल ॲथरिटी लेटर रु. ५००/- च्या स्टॅम्पपेपरवर सादर करणे आवश्यक राहील.

२०. सदर वरिल कामाचे काम पुर्ण झाल्यानंतरचे प्रदान करावयाचे देयक निधी प्राप्त झाल्यांनंतरच प्रदान करण्यात येईल याची निविदा धारकांनी नोंद घ्यावी .

२१. सदर कामाचा कृती आराखडा न.प अभियंता यांचे कडुन मंजुर करून घेणे बंधनकारक राहील.

२२. प्रकल्प अंतर्गत ची कामे सुरु करण्या पुर्वी प्रत्यक्ष जागेवरील सद्यास्थिती व काम चालु असतानाचे व काम झाल्यानंतरच्या प्रत्येक कामाचे छायाचित्र काढुन अहवाल या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील

२३. कंत्राटदाराने कामाबाबत आवश्यक असलेल्या यंत्र सामुग्री डांबरीकरणू कामा करीता निविदे सोबत हॉटमिक्स प्लांट चालु असले बाबत मा. कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे प्रमाणपत्र जोडने अनिवार्य राहील तसेच कंत्राटदाराकडे प्लांट उपलब्ध नसल्यास हॉट मिक्स प्लांट धारकाचे रु.१००/- किमतीच्या स्टॅप पेपर वर हमीपत्र/संमतीपत्र सोबत जोडने आवश्यक राहील व तांत्रीक कर्मचारी यांची यादी /उपलब्ध स्कॅन करुन अपलोड करावी लागेल.

२४. कंत्राटदारास निविदेतील व करारनामा मधील सर्व अटी व शर्ती मान्य करणे बंधनकारक राहील.

| आतिश बोरेले | आतिश चव्हान | प्रफुल जिड्डेवार | पंकज गावंडे |
|---|---|---|---|
| नगराध्यक्ष | उपनगराध्यक्ष | बांधकाम सभापती | मुख्याधिकारी |
| नगर परिषद पांढरकवडा | नगर परिषद पांढरकवडा | नगर परिषद पांढरकवडा | नगर परिषद पांढरकवडा |

Signature Not Verified
Digitally signed by Amol Sharad Khuspure
Date: 2026.05.13 12:44:34 IST
Location: Maharashtra-MH

Scanned with OKEN Scanner